सं.फौ.ख.क्र.१०५९/२०२३
शासन विरुध्द गणेश
नि.क्र.१२ खाली

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३**
मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव – चेतन प्रकाश पिसाळ,
वय – ४२ वर्षे, कामधंदा - बाजार समितीमध्ये सुपरवायजर,
राहणार– ओझर्डे, ता.वाई. जि.सातारा

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस.आर.महाडीक** -

मी मागील १० ते १५ वर्षांपासून कृषी उत्पन्न बाजार समिती वाई येथे नोकरीस आहे. दि.०४.०५.२०२३ रोजी आमच्या बाजार समितीचे शिपाई विलास वसंत गायकवाड यांचा मला सकाळी ७.०० च्या सुमारास फोन आला की, बाजार समितीच्या दक्षिण बाजूस असलेले तार कंपाऊंड थोडेसे तोडण्यात आलेले होते. त्यामुळे मी ७.३० च्या सुमारास तेथे पोहोचलो आणि आमच्या बाजार समितीचे सचिव राजेंद्र पांडुरंग क्षिरसागर यांना त्याबाबत कळविले. त्यानंतर सकाळी १०.३० च्या सुमारास श्री.क्षिरसागर, आमच्या समितीचे सहसचिव श्री. आनंदा राजापुरे, लिपीक मिलींद इथापे आणि शिपाई विलास गायकवाड व अनिल सावंत असे मिळून पुन्हा ज्याठिकाणी तार कंपाऊंड तोडले होते त्याठिकाणी गेलो. त्याठिकाणी गणेश सावंत म्हणजेच न्यायालयासमक्ष हजर असलेला आरोपी तेथे हजर होता. त्यास श्री.क्षिरसागर यांनी म्हटले की, ‘तुम्ही यापुर्वी सुध्दा ब-याचदा तार कंपाऊंड तोडले आहे, तुम्ही संस्थेचे प्रशासक श्री.खामकर साहेब यांच्याशी बोला'. त्यावर आरोपी म्हणाला की आता राहू दे संचालक मंडळ आल्यावर मी तार कंपाऊंड जोडून देईन. पोलीसांनी माझ्याकडे घटनेबाबत चौकशी केली होती व त्याबाबत जबाब नोंदविला होता.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.खामकर -**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी लिपीक पदावर कार्यरत असल्याने बाजार समितीतील कार्यालयाबाहेर होणा-या घटनाक्रमांशी माझा काहीएक संबंध येत नाही. साक्षीदार सांगतो की, माझा बाजार समितीच्या आवारातील संपूर्ण परिसराशी संबंध येत असतो. सदरील आवाराचे एकुण क्षेत्र २ हेक्टर ५४ आर असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीच्या

दक्षिणबाजूला शेतजमिनी आहेत व तेथे नारायण जाधव तसेच आरोपी गणेश यांच्या शेत मिळकती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीचा मुख्य उद्देश हा शेतक-यांकडून त्यांचा शेतमाल खरेदी करून त्याची विक्री करणे असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीशी संलग्न असलेल्या शेतक-यांची संख्या अमाप असल्याने मला त्या सर्वांची नावे सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सदरील शेतक-यांकरीता बाजार समितीत नेमक्या कोणत्या ठिकाणाहून प्रवेश व्हावा याकरीता निश्चित अशी जागा ठेवलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीच्या पुर्व व दक्षिण बाजूला पूर्वापार काळापासून सरबांध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या सरबांधाचा वापर शेतकरी त्यांच्या शेतात जाण्यायेण्यासाठी करतात. आमच्या बाजार समितीचा हेतू शेतक-यांचे हित जपण्याचा आहे. आरोपी हासुध्दा शेतकरीच आहे.

३. बाजार समिती व लगतचे शेतकरी यांच्यामध्ये झालेल्या वादाबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीच्या आवाराच्या दक्षिण बाजूला शेतकरी त्यांची शेती करताना मी पाहिलेले आहे. सदरील शेतक-यांचा बाजार समितीच्या आवारातून जाण्या येण्याबाबत वाद असल्याबाबत मला कल्पना नाही.

४. पोलीसांनी मला प्रस्तुत प्रकरणात चौकशीकामी बोलाविले होते. मला त्याकरीता घटनेच्या दिवशी बोलाविले नव्हते तर नंतर बोलाविले होते. मला ज्या फोनद्वारे कथित घटनेबाबत पहिल्यांदा कथितरित्या माहिती मिळाली होती त्याबाबत पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली नव्हती. कथित घटना माझ्या कार्यालयीन दिवशी घडली होती. कार्यालयीन उपस्थितीबाबत आमच्या कार्यालयात मस्टर आहे. पोलीसांनी मी कथितरित्या घटनेच्यादिवशी व तद्नंतर कार्यालयात हजर होतो किंवा कसे याबाबत माझ्याकडे चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्याकडून मी बाजार समितीत लिपीक पदावर कार्यरत असल्याचे दर्शविण्याकरीता कोणताही कागदोपत्री पुरावा हस्तगत केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी बाजार समितीत नोकरीस नसल्यामुळे तसा कोणताही कागदोपत्री पुरावा पोलीसांनी हस्तगत केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मला शिपायाचा फोन आल्याचे आणि त्यानंतर मी घटनास्थळी गेल्याचे तसेच त्यांनतर बाजार समितीतील सचिव

सहसचिव इत्यादी यांच्यासह पुन्हा सकाळी १०.३० च्या सुमारास घटनास्थळी गेल्याचे आणि तेथे आरोपी व समितीचे अधिकारी यांच्यात बोलणी झाल्याचे खोटे सांगत आहे.

५. मी आरोपी गणेश यास नोकरीस लागल्यापासून ओळखतो. आरोपीच्या शेत मिळकतीचा गट क्र.७६ आहे व आमच्या बाजार समितीच्या आवाराचा गट क्र.७५ आहे. सदरील दोन्ही मिळकतींची एकत्रीत मोजणी झाल्याचे मला माहिती आहे. ती मोजणी नेमकी कोणत्या वर्षी झाले हे मला आजरोजी आठवत नाही. त्यावेळी हद्दीवरुन त्या दोघांमध्ये वाद झाल्याचे मला माहिती नाही. गणेश सावंत यांच्या गट क्र.७६ च्या उत्तर बाजूस तार कंपाऊंड नसल्याचे मला सांगता येणार नाही. आमच्या बाजार समितीच्या परिसराला तार कंपाऊंड असल्याबाबत पोलीसांनी कागदोपत्री पुरावा हस्तगत केला होता किंवा कसे याबाबत मला सांता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आवाराच्या दक्षिण बाजूस कोणतेही तार कंपाऊंड नाही. हे म्हणणे खरे नाही की, आवाराचे तार कंपाऊंड तोडल्याचे आणि ते मी प्रत्यक्ष पाहिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणताही घटनाक्रम घडलेलाच नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, बाजार समितीचे व दक्षिणेकडील शेत मिळकत धाराकांचे हद्दीवरुन वाद असल्याने मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गणेश याने कधीही तार कंपाऊंड जोडून देतो असे म्हटलेच नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वरिष्ठ अधिका-यांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काहीही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2026.01.16 15:09:33 +0530

दि.१५.०१.२०२६

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, वाई.